**बातमी प्रसिध्दीसाठी**

महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठांमध्ये उपलब्ध असणा-या विविध विद्या शाखांमध्ये शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ साठी पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सामाईक प्रवेश परीक्षा २०१६ महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचे मार्फत आयोजित करण्यात आली आहे. सदर परीक्षेसाठी संबंधीत विद्याशाखेचे पदवीधर आणि सन २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षाच्या अंतिम पदवी परीक्षेस बसणारे विद्यार्थी पात्र राहतील. ऑनलाईन (Online) अर्ज भरण्याची तारीख २०.०१.२०१६ ते २१.०२.२०१६ अशी राहील. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर जनरेट होणा-या चलनाव्दारे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या स्थानिक शाखेत परीक्षा शुल्क दि. २१.०१.२०१६ ते दि. २२.०२.२०१६ तारखेपर्यंत स्वीकारली जाईल. ही परीक्षा दिनांक १७ मार्च, २०१६ ते २० मार्च २०१६ या कालावधीत महाराष्ट्रातील चौदा केंद्रावर आयोजित करण्यात येत आहे. सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील अर्ज महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे http://www.mcaer.org या संकेतस्थळावर स्वतः भरावयाचे आहे. अर्ज भरण्यापूर्वी संपूर्ण माहितीपत्रक वाचणे गरजेचे आहे. संबंधित अर्ज महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांच्याकडे पाठविण्याची आवश्यकता नाही. संभाव्य पात्र व अपात्र उमेदवारांची यादी दिनांक ०१.०३.२०१६ रोजी संकेतस्थळावर उपलब्ध होईल. पात्र उमेदवारांनी आपले परीक्षा प्रवेश पत्र वरील संकेतस्थळावरुन दि. १०.०३.२०१६ पासून स्वतः प्रिंट काढून उपलब्ध करुन घ्यावयाचे आहे.

उत्तराची नमुना पत्रिका दि. ७.०४.२०१६ व परीक्षेचा निकाल दि.११.०४.२०१६ रोजी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे http://www.mcaer.org या संकेतस्थळावर पाहण्यास उपलब्ध राहील. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२० २५५१०४१९/०२० २५५१०५१९ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे डॉ. आर.के. रहाणे, नियंत्रक महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांनी कळविले आहे.

दिनांक : १९/०१/२०१६
स्थळ : पुणे

नियंत्रक
महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे